**भारत-मालदीव राजनयिक संबंध प्रस्थापनेच्या 60व्या वर्षपूर्ती निमित्तानं स्मृती टपाल तिकिटाचं अनावरण (25 जुलै 2025)**

25 जुलै 2025

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि मालदीवचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मूइज्जू यांनी भारत-मालदीव राजनयिक संबंध प्रस्थापनेच्या 60व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने स्मृती टपाल तिकिटाचं अनावरण केलं.

2. उभय देशांमधील पारंपरिक द्विपक्षीय संबंधांचं प्रतिबिंब तिकिटावकर पाहायला मिळेल. स्मृती टपाल तिकिटावर केरळमधील बेपोरच्या ऐतिहासिक बोट आगाराच्या आवारात हस्तनिर्मित केलेली एक भव्य लाकडी जहाज उरू आणि पारंपारिक मालदीवची मासेमारी बोट - वधू धोनी यांचं चित्रण आहे.  या नौका शतकानुशतके हिंदी महासागरातील व्यापाराचा भाग आहेत.  पारंपारिक मालदीव मासेमारी बोट - वधू धोनी - रीफ आणि किनारी मासेमारी साठी वापरली जाते.  हे मालदीवच्या समृद्ध सागरी वारशाचे आणि बेटावरील जीवन आणि समुद्र यांच्यातील जवळचे नाते दर्शवते.

3. वर्ष 1965 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मालदीव सोबत राजनयिक संबंध प्रस्थापित करणारा भारत हा पहिला देश ठरला होता.  स्मृती टपाल तिकिटे उभय देशांमधील घनिष्ठ आणि ऐतिहासिक संबंधांचे प्रतीक आहेत.

**माले**

25 जुलै 2025